(१)

(१)


# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

296

सिडको भवन, (दक्षिण कक्ष) बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७१६७३, २७५७०१६६, २७५७१६७७,२७५७८४०९
फॅक्स : २७५७०९६१, २७५७१६६६.


जा.क्र.मजीप्रा/२०११/सभा-१२०/१४/आ-४

दिनांक : ८/०६/२०११

प्रति,

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगरविकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, (ऊर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, (२) नगर विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव, ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव (वित्त व प्रशासन)/(तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

<u>विषय</u> : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२० च्या सभेचे इतिवृत्त.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मंगळवार दि.२९ मार्च, २०११ रोजी झालेल्या १२० सभेचे इतिवृत्त यासोबत पाठविण्यांत येत आहे. सदर इतिवृत्ताबाबत आपले काही अभिप्राय असल्यास, ते या कार्यालयास कृपया त्वरीत कळवावेत.

सदर अभिप्राय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये विचारार्थ सादर करण्यांत येतील.

<u>सोबत</u> :- १२० व्या सभेचे इतिवृत्त.

आपली विश्वासू,
उ.प्र. महाजन
**(उ.प्र. महाजन)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी**

(कृ.मा.प.)

प्रत :

१. वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.

आपणास विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रमबाब क्र.२,३,४,५, व ७ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचां अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

२. सर्व मुख्य अभियंता, म.जी.प्रा., प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर.

आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रमबाब क्र.२, व आयत्यावेळची चर्चेवर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल मध्यवर्ती कार्यालयास त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

३. अधीक्षक अभियंता, मुख्यालय, म.जी.प्रा., मुंबई

४. उप मुख्य लेखा अधि.(१) व (२) म.जी.प्रा., नवी मुंबई.

५. आस्थापना अधिकारी (द.) म.जी.प्रा., मुंबई.

६. प्रशासकीय नि आस्था.अधि., म.जी.प्रा., नवी मुंबई.

आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रमबाब क्र.२ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

७. कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रमबाब क्र.६ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

८. मध्यवर्ती कार्यालयातील सर्व कक्ष/कार्यासन अधिकारी यांच्या माहितीसाठी.

९८०/५/७

(३)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२० व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १२० वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.लक्ष्मण ढोबळे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक २९ मार्च, २०११ रोजी संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा.ना.श्री.लक्ष्मण ढोबळे, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा.ना.श्री.जयंत पाटील, मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह-अध्यक्ष.
३. मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य पा.पु. व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा.सचिव, ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, ग्रामविकास विभाग. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
५. मा.प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.य.द. देशकर, अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई, ४०००३२.
६. श्रीमती. मालिनी शंकर, सदस्य सचिव (प्रशासन व वित्त) म.जी.प्रा. मुंबई ४०००३२.
७. श्री.राजेंद्र होलाणी, सदस्य सचिव(तां.) म.जी.प्रा. मुंबई ४०००३२.

या व्यतिरिक्त सदर सभेस मजीप्राचे खालील अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.

१. श्री. एस.डी. चव्हाण, वि.स. व मु.ले.अ. (अतिरिक्त कार्यभार) म.जी.प्रा., नवी मुंबई,
२. सौ.उषा प्र.महाजन, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.
३. श्री.बा.शि.पाटील, उप मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
४. श्री.शेळके, उप मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

**मा.अध्यक्ष, मजीप्रा तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

सदस्य सचिव (प्र. व वि.)
मजीप्रा

**कार्यक्रम बाब क्र.१ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११९ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक १७.२.२०११ रोजी संपन्न झालेल्या ११९ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

कार्यक्रम बाब क्र.२ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११९ व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कृती

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक. १७.२.२०११ रोजी संपन्न झालेल्या ११९ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यांत आले होते त्या निर्णयांच्या अनुषंगाने करण्यांत आलेल्या कार्यवाहीबाबत मा. सदस्य सचिव (वित्त व प्रशासन) यांनी संचालक मंडळास अवगत केले. ११९ व्या बैठकीतील आयत्या वेळची चर्चा क्र.१ मधील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आर्थिक परिस्थितीबाबत सादर केलेल्या इतिवृत्ताकडे मा. मंत्री, ग्राम विकास तथा मजीप्राचे सहअध्यक्ष यांनी लक्ष वेधले. त्यामध्ये सन २०१०-२०११ च्या वित्तीय वर्षामध्ये रु.११०.९३ कोटी इतकी तुट दर्शविली असून त्यावर काय उपाय योजना करावी लागेल याची त्यांनी विचारणा केली.

वरील विचारणेला अनुसरुन मा.सदस्य सचिव यांनी मजीप्रामध्ये २५२३ अतिरिक्त कर्मचारी असून त्यांच्या वेतन व भत्यावरील खर्च तसेच मजीप्रामार्फत पाणी पुरवठ्याच्या ज्या अहस्तांतरीत योजना चालविण्यांत येतात त्या नफ्यात नसल्याने तूट होत असल्याचे सांगितले. मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनीही संचालक मंडळास असेही अवगत केले की, मजीप्राच्या आस्थापनेवर आज रोजी एकूण २५२३ अधिकारी/ कर्मचारी अतिरिक्त ठरत असुन त्यामध्ये नियमित आस्थापनेवरील ११३३ कर्मचारी व रुपांतरीत स्थायी अस्थायी आस्थापनेवरील १३९० कर्मचारी आहेत.

मुख्यत्वे चित्र शाखेमध्ये कार्यरत असलेले आरेखक, सहा.आरेखक, अनुरेखक तयेच भांडार कक्षातील भांडारपाल, सहाय्यक भांडारपाल या संवर्गातील कर्मचाऱ्यांना आता कामे नसल्याने ते अतिरिक्त ठरत आहेत, तसेच मजीप्राकडील कामे कमी झाल्याने काही मंडळ/ विभाग / उप विभाग बंद केले असल्याने काही संवर्गातील कर्मचारी अतिरिक्त ठरत आहेत. तसेच मजीप्राचे १४ विभाग व ५५ उप विभाग जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करताना मजीप्राचे कर्मचारी हस्तांतरीत न झाल्याने व

| | |
|---|---|
| **मा.अध्यक्ष, मजीप्रा तथा** | **सदस्य सचिव (प्र. व वि.)** |
| **मंत्री, प्रा.पु. व स्व.** | **मजीप्रा** |

सद्य:स्थितीत हे कर्मचारी जिल्हा परिषदेमध्ये प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत, असे सर्व कर्मचारी अतिरिक्त ठरत आहेत, असेही निदर्शनास आणले. जिल्हा परिषद अधिनियमानुसार अशा कर्मचाऱ्यांना त्यांचे विकल्प घेऊन, जिल्हा परिषदेकडे कायम स्वरुपी समायोजनाची कार्यवाही करणे आवश्यक आहे, असे सदस्य सचिव (प्रशासन व वित्त) यांनी निदर्शनास आणले. त्यांना मा.सचिव, ग्राम विकास यांनी असे सुचित केले की, मजीप्राचे जे कर्मचारी जिल्हा परिषदेकडे प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत, (प्रतिनियुक्ती भत्याशिवाय) त्यांचेकडून, ते जिल्हा परिषदेच्या सेवेमध्ये कायमस्वरुपी समावेशनास तयार असल्याबाबत विकल्प घेण्यांत यावा. त्यानुसार त्यांना जिल्हा परिषदेमध्ये (ग्राम विकास विभागाकडे) कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्यांत यावे. या बाबतची प्राथमिक कार्यवाही मजीप्राच्या स्तरावर पूर्ण करुन अंतिम समावेशनाची कार्यवाही पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व ग्राम विकास विभागाच्या स्तरावर करणेंत यावी असे मा.अध्यक्ष व सहअध्यक्ष यांनी सांगितले.

यावर मा.सचिव, ग्रामविकास यांनी असे सुचित केले की, जिल्हा परिषदा ही स्वायत्त संस्था असून, ते मजीप्राचे रुपांतरीत स्थायी/अस्थायी आस्थापनेवरील कर्मचारी घेण्यास इच्छूक नाहीत. कारण मजीप्राच्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते हे जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांपेक्षा जास्तीचे असतात. त्यामुळे जास्त वेतन देऊन मजीप्राचे कर्मचारी जिल्हा परिषदेकडे घेण्यास जिल्हा परिषदा तयार नाहीत. यावर मा.सदस्य सचिव (तां.) यांनी असे निदर्शनास आणून दिले की, परळी वैजनाथ नगर परिषदेकडे मजीप्राचे रुपांतरीत स्थायी/अस्थायी आस्थापनेवरील ३० कर्मचारी पाठविण्यात येत असून, त्यांना नगर परिषदेने ठरविलेले किमान वेतन नगरपरिषद देतील व त्यांच्या वेतनातील जो फरक येईल तो मजीप्रा अदा करणार आहे. याप्रमाणे मजीप्राचे रुपांतरीत स्थायी/अस्थायी आस्थापनेवरील जे कर्मचारी अतिरिक्त ठरत आहेत, अशा कर्मचाऱ्यांना जि.प./न.प./न.पं. कडे किमान वेतनावर (मुळवेतन) पाठविण्यात यावे व त्यांच्या वेतनातील फरक मजीप्राने सोसावा, जेणेकरुन मजीप्रावरील आर्थिक भार काही प्रमाणात कमी होईल. याबाबत कर्मचाऱ्यांकडून विकल्प मागविणे इ. उचित ती कार्यवाही त्वरीत मुख्य अभियंता यांचेकडून पूर्ण करुन घेण्यात यावी असे ठरले.

मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सहअध्यक्ष यांनी असेही निर्देश दिले की स्थानिक संस्थांनी हस्तांतरीत करुन न घेतलेल्या परंतु, मजीप्रा चालवित असलेल्या ६९ प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांपैकी (आता ५२) किती योजना फायद्यात आहेत व किती योजना तोट्यात चालत आहेत या बाबत अद्यावत माहिती संचालक मंडळाच्या पुढील बैठकीमध्ये ठेवावी.

मा.अध्यक्ष, मजीप्रा तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव (प्र. व वि.)
मजीप्रा

ज्या मजीप्राच्या पाणी पुरवठा केंद्रांतून ग्राहकांना ठोक स्वरुपात पाणी पुरवठा केला जातो तेथे वॉटर मीटर बसवून पाणी पुरवठा करावा, जेणेकरुन मजीप्राच्या उत्पन्नात वाढ होईल.

तसेच पाणी पुरवठा केंद्रावरील कार्यरत यंत्र सामुग्रीची नोंद नोंदवहीत घेण्यांत यावी व जे साहित्य निकामी झाले आहे तेही जडसंग्रही नोंदवावे असे मा.मंत्री तथा अध्यक्ष, मजीप्रा यांनी सुचविले.

तसेच मुख्य अभियंत्यांच्या नियंत्रणाखाली जी पाणी पुरवठा केंद्रे आहेत त्यांनी विशेषत: त्यातील जी पाणी पुरवठा केंद्रे तोट्यात चालत आहेत ती फायद्यात कशी आणता येतील याबाबत १०० दिवसांत आराखडा तयार करावा. त्यामध्ये कर्मचारी, यंत्र सामुग्री, विद्युत देयक, अथवा दुरुस्तीबाबत प्रतीदिनी किती खर्च होतो? त्यामध्ये कशी बचत करता येईल याबाबतचा आढावा घेऊन सदर आढावा जुलै २०११ च्या १० तारखेपर्यंत सर्व मुख्य अभियंत्यांनी मा.सदस्य सचिव, (तां.) व मा.सदस्य सचिव (प्र.व वि.) यांना स्वतंत्रपणे सादर करावा, असेही अध्यक्षांनी सांगितले.

तसेच पाणी पुरवठा केंद्रावर जे अभियंते एकाच ठिकाणी १० ते १५ वर्षापासून कार्यरत असून देखील पाणी पुरवठा केंद्र तोट्यात चालत आहेत. त्यांची सदर पाणी पुरवठा केंद्रावरुन त्वरीत बदली करावी, जेणेकरुन पाणी पुरवठा केंद्रावरील तुट कमी होण्यास हातभार लागेल असे मा.मंत्री तथा अध्यक्ष मजीप्रा यांनी सांगितले.

वरील सर्व सूचनांच्या अनुषंगाने त्वरीत कार्यवाही करुन योग्य ते निर्णय सर्व मुख्य अभियंत यांनी घ्यावेत व संचालक मंडळास त्याबाबत अवगत करावे असेही मा.अध्यक्षांनी सांगितले.

**कार्यक्रम बाब क्र.३ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळण्याबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीतील मुद्दयांबाबत मा. सदस्य सचिव, यांनी बैठकीमध्ये उहापोह केले यावर मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व मा.सचिव, ग्रामविकास विभाग यांनी संचालक मंडळाच्या निदर्शनास असे आणून दिले की, मजीप्रामार्फत जी रक्कम गुंतवणूक केली जाते त्या गुंतवणूकीतून प्राप्त होणाऱ्या व्याजाचा उपयोग शासनाच्या पूर्वमान्यतेने विकास कामांसाठी करण्यात यावा असे स्पष्ट केले. सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा होऊन दिनांक. १२.२.२० ते २३.३.२०११ या कालावधीत अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीस मान्यता देण्यांत आली. पुढील कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव, प्रशासन व वित्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**मा.अध्यक्ष, मजीप्रा तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव (प्र. व वि.)**
**मजीप्रा**

कार्यक्रम बाब क्र.४ : म.जी.प्रा. चा सन २००८-०९ चा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल.

सदर कार्यक्रम बाबीतील मुद्दयाबाबत वि.स.व मु.ले.अ. यांनी सन २००८-०९ या वार्षिक लेखा परिक्षण अहवाला विषयी संचालक मंडळास अवगत केले. यावर मा.मंत्री, ग्राम विकास तथा मजीप्राचे सहअध्यक्ष यांनी महालेखाकार, मुंबई यांच्या लेखा परिक्षण अहवालामध्ये मजीप्रा बाबत काही आक्षेपार्ह मुद्दे उपस्थित केले आहेत काय? अशी विचारणा केली. तसेच महालेखापालांनी वेळोवेळी उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण वेळीच होणे आवश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले.

यावर वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी वार्षिक लेखा परिक्षण अहवालामध्ये कोणतेही आक्षेपार्ह मुद्दे नमुद केलेले नाहीत, असे सुचित केले. अंतिमत:, सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा होऊन कार्यक्रम बाब मान्य करण्यात आली आणि पुढील कार्यवाही करण्यांस मा.सदस्य सचिव, (प्रशासन व वित्त) यांना प्राधिकृत करण्यांत आले.

कार्यक्रम बाबत क्र.५ : सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार मजीप्राच्या भविष्य निर्वाह निधी वर्गणीधारकांचे भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये वेतनाच्या थकबाकीचे हप्ते जमा करणे. त्यावरील व्याज आकारणी व उचलीवर प्रतिबंध.

सदर कार्यक्रम बाबीतील मुद्दयाबाबत वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी संचालक मंडळास अवगत केले, महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाचे परिपत्रक क्र.वेपूर-१२०९/प्र.क्र.-६९/सेवा-९/ दि.२९.४.२००९ मधील परिच्छेद क्र.१४ (१५:३) मधील तरतुदीनुसा सहाव्या वेतन आयोगानुसार थकबाकीच्या ५ हप्त्यांपैकी १ पहिला हप्ता सन २०११-१२ या वर्षापासू कर्मचाऱ्यांच्या भ.नि.नि. खात्यामध्ये जमा करावा लागेल, ही बाब संचालक मंडळाच्या निदर्शना आणून देण्यांत आली.

यावर मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी संचालक मंडळाच्या अ निदर्शनास आणले की, सहाव्या वेतन आयोगानुसार फरकाची रक्कम निधीच्या उपलब्धतेनुस भ.नि.नि. मध्ये जमाकरण्याची तरतूद मजीप्राने आदेशांमध्ये केली आहे.

सद्य:स्थितीत निधी उपलब्ध नसल्याने मजीप्राची आर्थिक स्थिती पहाता सदर कार्यक्रम ब पुढील आदेशापर्यत स्थगित ठेवण्यांत यावी. यावर संचालक मंडळाने संमती दर्शविली असल्य सदर कार्यक्रमबाब तूर्त अमान्य करण्यांत आली.

मा.अध्यक्ष, मजीप्रा तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

३/६

सदस्य सचिव (प्र. व वि.)
मजीप्रा

कार्यक्रम बाब क्र.६ : म.जी.प्रा. च्या पॅनेलवरील वकिलांचे मानधनाचे दराबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा. सदस्य सचिव, (प्र. व वि.) यांनी संचालक मंडळास अवगत केले. मजीप्राच्या पॅनेलवरील वकीलांना जुन्या दराने मानधन देण्यात येत असून ते फारच कमी असल्याने पुढीलप्रमाणे दि.१.४.२०११ पासून मानधनात वाढ करण्याचे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | न्यायालयाचे स्वरुप | सध्याचे निर्धारित दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १) | प्राधिकरणातील (दिवाणी कनिष्ठ व वरिष्ठ स्तर) तसेच कामगार न्यायालय, प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी, जिल्हा ग्राहकमंच, सक्षम अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी यांच्या समोरील प्रकरणासाठी. | प्रत्येक प्रकरण चालविण्यासाठी रु.५,०००/- (एकत्रित) | प्रत्येक प्रकरण चालविण्यासाठी रु.८,०००/- (एकत्रित) |
| २) | जिल्हा न्यायालय / औद्योगिक न्यायालय | प्रत्येक प्रकरण चालविण्यासाठी रु.७,०००/- (एकत्रित) | प्रत्येक प्रकरण चालविण्यासाठी रु.१२,०००/- (एकत्रित) |
| ३) | उच्च न्यायालय | प्रत्येक प्रकरण चालविण्यासाठी रु.९,०००/- (एकत्रित) | प्रत्येक प्रकरण चालविण्यासाठी रु.१५,०००/- (एकत्रित) |

वरीलप्रमाणे संचालक मंडळाने मजीप्राच्या पॅनेलवरील वकिलांचे मानधन (दर) वाढविण्यांस दि.१.४.२०११ पासून मान्यता दिली असून पुढील कार्यवाही करण्यांस मा.सदस्य सचिव, (प्र.व वि.) यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**मा.अध्यक्ष, मजीप्रा तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव (प्र. व वि.)**
**मजीप्रा**

कार्यक्रम बाब क्र.७ : म.जी.प्रा. चे सन २०१०-११ चे सुधारित अंदाज व सन २०११-१२ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.

वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी मजीप्राचे सन २०१०-२०११ चे सुधारित अंदाज व सन २०११-२०१२ चे अर्थसंकल्पीय अंदाज संचालक मंडळासमोर सादर केले. सन २०१०-२०११ या वर्षात २१.८९ कोटी तुट दर्शविण्यांत आली आहे. मजीप्राची आर्थिक परिस्थिती सध्या ठीक नाही. मजीप्राचे अधिकारी व कर्मचा-यांचे दरमहा वेतन अदा करणेही कठीण जात आहे. मजीप्राची शिल्लकी रक्कम, महसूली जमा व योजनेवरील निधी काही प्रमाणात वेतन व भत्यासाठी वापरण्यात येऊन तद्नंतर वेतन अदा करण्यात येते असे, वि.स. व मु.ले.अ. यांनी संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून दिले. *"मजीप्राचा अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी (पुढील वर्षाच्या) प्रत्येक विभागाच्या मुख्य अभियंतांमार्फत विभागातील सर्व योजनांना १०० दिवसांमध्ये प्रत्यक्ष आढावा घेऊन महसूली उत्पन्न वाढविण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांसह कृति आराखडा सदस्य सचिव यांचेमार्फत मंडळापुढे सादर करावा असे मा.सहअध्यक्ष, मजीप्रा यांनी सुचित केले."*

यावर चर्चा होऊन संचालक मंडळाने पुढीलप्रमाणे ठराव संमत केला.

ठराव :

असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाने सन २०१०-११ चे सुधारित अंदाज व सन २०११-१२ चे महसुली व भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज खालीलप्रमाणे मान्य करण्यात येत आहे.

(रुपये लाखात)

| अ.क्र. | तपशील | सन २०१०-११ चे सुधारित अंदाज | सन २०११-१२चे अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| १. | महसुली जमा | ३४४९५.६८ | ४६५१२.०६ |
| २. | महसुली खर्च | ३६६८५.२८ | ५४७९४.७६ |
| ३. | भांडवली जमा | १४२४९३.६४ | १६५५४८.१३ |
| ४. | भांडवली खर्च | १४२४९३.६४ | १६५५४८.१३ |

असाही ठराव करण्यात येतो की, ज्या नगरपालिकांना OTS अंतर्गत अंदाजपत्रकातील तरतुदींव्दारे कर्ज परतफेडीस शासनाकडून मदत होत आहे अशा नगरपालिकांची भविष्यातील भांडवली स्वरुपाची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देण्याबाबत शासनास विनंती करण्यात यावी.

मा.अध्यक्ष, मजीप्रा तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव (प्र. व वि.)
मजीप्रा

असाही ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पुरेसे काम नसल्याने निवृत्तीवेतनाचा खर्च भागविण्यासाठी उत्पन्नाचे साधन उपलब्ध नाही म्हणून हा खर्च भागविण्यासाठी शासनाकडून अनुदान स्वरुपात सहाय्य मिळण्याबाबत शासनास विनंती करण्यात यावी.

मजीप्राची इतर स्थानिक संस्थांकडे दि.३१.१२.२०१० पर्यत पाणीपट्टी व कर्जापोटी रु.३५१३.९१ कोटी थकबाकी आहे. सदर थकबाकी वसुल करण्याबाबत प्रयत्न करण्यांत येत असुन तेवढा प्रतिसाद स्थानिक संस्थेकडून मिळत नसल्याने मजीप्राची थकबाकी वाढत आहे.

मजीप्राचे एकूण ९७ थकबाकीदार (मनपा/नपा) असुन त्यापैकी ५० कोटीपेक्षा जास्त येणे रक्कमा असलेल्या १६ स्थानिक संस्था आहेत. त्यातील प्राधान्यक्रमावर असलेल्या १० स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वसुलीकडे प्राथम्याने पाठपुरावा करावा. त्यांचेकडून वसुली होत नसलेबाबतची बाब मा.मुख्य सचिव, यांच्या निदर्शनास मा.मंत्री पा.पु. व स्व. वि. तथा मजीप्राचे अध्यक्ष यांनी आणून द्यावी असेही सह अध्यक्ष यांनी सुचविले.

या वसुलीबाबत मा.आयुक्त व मुख्याधिकारी यांची मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे एक बैठक आयोजित करुन मजीप्रांची थकबाकी भरण्याबाबत प्रस्ताव चर्चिल्या जावा असे त्यांनी सुचविले. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्याकडे पाणीपट्टीपोटी ज्या रक्कमा जमा होतात त्या शिर्षकाखाली "मजीप्राची थकबाकी" या नावाने उप शीर्षक उघडून, त्या शिर्षकामध्ये काही रक्कमा जमा कराव्यात व ती रक्कम मजीप्राकडे प्रतिवर्षी भरावी यासाठी त्यांना विनंती करण्यांत यावी असेही सुचविले. याबाबतची कार्यवाही पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत करण्यांत यावी असा निर्णय घेण्यांत आला.

तसेच नगर विकास खात्यामार्फत नगरपरिषदा/नगरपालिका यांना जे अनुदान दिले जाते, अशा अनुदानातून मजीप्रास येणे असलेल्या नगरपालिकांकडून थकबाकीची रक्कम परस्पर मजीप्रास देण्याबाबत अर्थसंकल्पात तरतूद करावी, Escrow Account व्दारे मजीप्रास येणे असलेली थकबाकी मजीप्रास मिळण्याबाबत प्रयत्न करावेत असेही सह अध्यक्ष यांनी सुचविले.

सदस्य सचिव (तां.) यांनी संचालक मंडळाच्या असेही निदर्शनास आणले की, थकबाकी वसुलीबरोबरंच मजीप्रास व्यवसाय मिळणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाने १९० कोटींची तरतूद नगरपालिका/महानगरपालिकांसाठी केली आहे. तर नगरपालिकांचे Project मजीप्रास मिळावेत, जेणेकरुन मजीप्राचा व्यवसाय वाढेल.

**मा.अध्यक्ष, मजीप्रा तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव (प्र. व वि.)**
**मजीप्रा**

१३ व्या वित्त आयोगातून नगर विकास विभागाने ज्या कणखरपणे वसुली केली, त्याच धर्तीवर कणखरपणे थकबाकीची वसुली होण्यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने प्रयत्न करावेत असेही सह अध्यक्ष यांनी बैठकीत सुचविले.

तोट्यातील योजना फायद्यात आणण्यासाठी खालीलप्रमाणे प्रयत्न सर्व मुख्य अभियंत्यांनी करावेत, असे सहअध्यक्ष, मजीप्रा यांनी सुचविले.

१. Recovery/वसुली किती होत आहे याचा प्रथम आढावा घ्यावा. त्याचबरोबर खर्चाचाही आढावा घ्यावा.

२. उत्पन्नापेक्षा खर्च जास्त होत असल्याने, अशा योजना निविदा मागवून कंत्राटदारास चालविण्यास द्याव्यात.

३. अशा योजनांच्या निविदा इतक्या जास्त किंमतीच्या नसाव्यात की, त्या योजनेवरील वसुली पेक्षा जास्त किंमतीच्या असतील.

४. Regular येणे व Offset Value यांचा आढावा घ्यावा.

मजीप्राच्या सन २०१०-११ चे सुधारित अंदाज व सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्राकाच्या अनुषंगाने, मा.मंत्री, पा.पु. व स्व.विभाग तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष व सहअध्यक्ष यांनी असे निर्देश दिले की, मजीप्राचा सन २०१२-१३ या वर्षाचा अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी प्रत्येक प्रादेशिक विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व पाणी पुरवठा योजनांचा १०० दिवसांमध्ये प्रत्यक्ष आढावा घेऊन महसूल व उत्पन्न वाढविण्यासाठी करावयाच्या उपाययोजनासह कृति आराखडा मा.सदस्य सचिव यांचेमार्फत संचालक मंडळापुढे सादर करण्यात यावा. जेणेकरुन, मजीप्राच्या उत्पन्नात वाढ करुन तुट कशी कमी करता येईल यासाठी सर्व मुख्य अभियंता यांनी कसोशीने प्रयत्न करावेत.

वरील प्रमाणे सर्वकष चर्चा करुन मजीप्राच्या वरील कार्यक्रम बाबीस संचालक मंडळाने मान्यता दिली व पुढील कार्यवाही करण्यांस मा.सदस्य सचिव (प्रशासन व वित्त) यांना प्राधिकृत करण्यात आले.

मा.अध्यक्ष, मजीप्रा तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

3/6

सदस्य सचिव (प्र. व वि.)
मजीप्रा

(१२)

आयत्यावेळची चर्चा.

**मा.मंत्री, पा.पु. व स्व.वि. यांनी पुढील बाबींकडेही संचालक मंडळाचे लक्ष वेधले.**

१) मजीप्राच्या मालकीच्या ज्या ६९ पाणी पुरवठा योजना (आता ५२) आहेत. त्या फायद्यात आणण्यासाठी सर्व मुख्य अभियंता यांनी १०० दिवसाचा कार्यक्रम आराखडा आखून या योजना फायद्यात आणण्याबाबत काय कार्यवाही करता येईल याबाबतचा आढावा घ्यावा व संचालक मंडळाच्या पुढील बैठकीत अहवाल सादर करावा.

२) मजीप्रा मार्फत ज्या आयुध निर्माण कारखान्यांना पाणी पुरवठा केला जातो (Ordinance Factory) त्या दरामध्ये वाढ करता येईल का? या बाबत आढावा घ्यावा.

३) मजीप्राच्या मालकीच्या जेथे-जेथे मोकळ्या जागा आहेत तेथे-तेथे तारेचे कुंपण अथवा अडीच फुटी संरक्षण भिंती घालाव्यात. आवश्यक तेथे बांधा वापरा व हस्तांतरण करा या तत्वावर काही दुकाने/ गाळे बांधून त्यापासून काही उत्पन्न वाढता यईल का? याचा विचार करावा व अहवाल सादर करावा.

४) मजीप्राचे जे अधिकारी/कर्मचारी उत्कृष्ट असे काम करीत आहेत, त्यांना मजीप्राकडून उत्तेजनात्मक काही बक्षीसे/प्रशस्तीपत्रे देण्यासंदर्भात योजना आखण्यात यावी. जेणे करुन मजीप्रामध्ये कष्टाळू व होतकरु अधिकारी/कर्मचा-यांच्या कामात वाढ होईल. तसेच जे अधिकारी/कर्मचारी जबाबदारीने कामे हाताळत नाहीत त्यांचेवर कडक कारवाई करावी.

५) मजीप्रामार्फत जेथे जेथे थेट ग्राहकापर्यत पाणी पुरवठा केला जातो, तेथे तेथे Water Meter (वॉटर मीटर) बसवावेत, जेणेकरुन पाणीपट्टीत वाढ होईल

वरील सर्व बाबींचा सर्वकष विचार सर्व मुख्य अभियंता यांनी करुन अहवाल सादर करावा.

बैठकीसमोर अन्य विषय नसल्याने उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर करण्यांत आले.

**मा.अध्यक्ष, मजीप्रा तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

सदस्य सचिव (प्र. व वि.)
मजीप्रा